उपसंचालक विमानचालन संचालनालय, मुंबई
<u>या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती</u>
कर्नल श्री.प्रदीप ढोले (निवृत्त),उपसंचालक (पुनर्वसन) सैनिक कल्याण विभाग,पुणे

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. विचासं-१११९/प्र.क्र.६८/२८-अ,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७/१२/२०१६
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१६/ प्र.क्र.५१०/कार्यासन-१२, दिनांक १६/२/२०१८
३) सैनिक कल्याण विभाग,पुणे यांचे दिनांक १/८/२०१९ चे पत्र

<u>शासन आदेश:</u>

सदंर्भाधीन क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित केले असून प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपध्दती विहित केली आहे.

२. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सैनिक कल्याण विभाग, पुणे येथे उपसंचालक (पुनर्वसन) या पदावर कार्यरत असलेले कर्नल प्रदीप ढोले यांची सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या विमानचालन संचालनालय, मुंबई या कार्यालयातील उपसंचालक पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१) कर्नल प्रदीप नरसू ढोले (निवृत्त) उपसंचालक (पुनर्वसन) सैनिक कल्याण विभाग,पुणे ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रुजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या मूळ पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारतील त्या तारखेला समाप्त होईल.

२) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकारी शासन/सक्षम प्राधिका-यास राहील.

३) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठवण्यिापूर्वी स्वीयेत्तर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिका-याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे आणि,

४) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची नोटीस शासनाला/सक्षम प्राधिका-याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

५) प्रतिनियुक्तीच्या कालावधीत सबंधित कर्मचा-यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा...इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १७-१२-२०१६ व १६-०२-२०१८ मधील तरतुदी विचारात घेऊन, विमानचालन संचालनालयाने प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती याबाबत सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्याशी सल्लामसलत करुन ठरवाव्यात.

६) कर्नल प्रदीप ढोले यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी विमानचालन संचालनालय,मुंबई व सैनिकी कल्याण,पुणे यांच्यामार्फत हाताळण्यात येतील.

७) कर्नल प्रदीप ढोले यांना सैनिकी कल्याण विभाग, पुणे या कार्यालयाने प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०९१६१८०३१३२३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bharat Budhaji Gawade

Digitally signed by Bharat Budhaji Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454666136340 0c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, cn=Bharat Budhaji Gawade
Date: 2019.09.18 11:36:41 +05'30'

(भ. बु. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी सादर,

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई ५६.
२. प्रभारी संचालक, सैनिक कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे
३. उप सचिव , माजी सैनिक कल्याण,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
४. कर्नल प्रदीप न.ढोले, उपसंचालक (पुनर्वसन),सैनिक कल्याण विभाग,पुणे
५. निवड नस्ती.